RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४३(५)] गुरुवार, मार्च १०, २०११/फाल्गुन १९, शके १९३२ [ पृष्ठे ४, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक १३

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**—मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. . . . . | १-४ |

नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० मार्च २०११.

## MAHARASHTRA ORDINANCE No. IX OF 2011.

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.

**सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

१८८८ चा मुंबई ३.
१९४९ चा मुंबई ५९.
१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत:—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०११ असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियमाची सुधारणा.**

सन १८८८ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ३ याच्या कलम ७८अ याची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश "मुंबई महानगरपालिका अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम ७८ अ च्या पोट-कलम (१) मध्ये,— १८८८ चा मुंबई ३.

महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षकाची नेमणूक.

"(क) "महानगरपालिका वेळोवेळी महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षक म्हणून योग्य अशा व्यक्तीची नेमणूक करील" या मजकुराऐवजी "राज्यशासन, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०११ याच्या कलम २ च्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून, विहित करण्यात येतील अशा योग्य त्या अटी व शर्तीवर, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा योग्य अधिकाऱ्याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करील" हा मजकूर दाखल करण्यात येईल ; २०११ चा महा. अध्या. ९.

(ख) पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल —

"परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०११ याच्या कलम २ च्या प्रारंभाच्या दिनांकास असे पद धारण करीत असलेल्या महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाच्या नियुक्ती व सेवेच्या अटी व शर्तीना बाधा पोहोचणार नाही.". २०११ चा महा. अध्या. ९.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम १३७ ब समाविष्ट करणे.

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १३७ अ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून लेखापरीक्षा आवश्यक करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

" **१३७ ब .** राज्य शासन, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या लेख्यांसह महानगरपालिकेच्या वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून अहवाल मिळाल्यानंतर राज्य शासन, तो आयुक्ताकडे पाठवील. आयुक्त अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, असा लेखापरीक्षा अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करील. त्यानंतर, आयुक्त, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यातील तरतुदींनुसार अहवालावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करील. ". १९३० चा मुंबई २५.

प्रकरण तीन

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याची सुधारणा

१९४९ चा मुंबई ५९. **४.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (यात यापुढे या प्रकरणात ज्याचा निर्देश " प्रांतिक महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे), याच्या कलम ४५ मधील, पोट-कलम (१) मधील "नगरपालिका मुख्य लेखापरीक्षक" हा मजकूर वगळण्यात येईल. सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ४५ ची सुधारणा.

**५.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम ४५ क समाविष्ट करणे.

२०११ चा महा. अध्या. ९. "**४५ क .** राज्यशासन, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०११ याच्या कलम ५ च्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून, विहित करण्यात येतील अशा योग्य त्या अटी व शर्तीवर, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उप संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा योग्य अधिकाऱ्याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करील: महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षकाची नेमणूक.

२०११ चा महा. अध्या. ९. परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०११ याच्या कलम ५ च्या प्रारंभाच्या दिनांकास असे पद धारण करीत असलेल्या महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकांच्या नियुक्ती व सेवेच्या अटी व शर्तींना बाधा पाहोचणार नाही.".

**६.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १०७ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल:— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम १०७ क समाविष्ट करणे.

"**१०७ क.** राज्यशासन, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून परिवहन उपक्रम असल्यास, त्याच्या लेख्यांसह महानगरपालिकेच्या वार्षिक लेख्यांची लेखापरीक्षा करण्याची व्यवस्था करील. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून अहवाल मिळाल्यानंतर राज्य शासन, तो आयुक्ताकडे पाठवील. आयुक्त, अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, असा लेखापरीक्षा अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करील. त्यानंतर, आयुक्त, महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यातील तरतुदींनुसार अहवालावर आवश्यक ती पुढील कार्यवाही करील.". संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्याकडून लेखापरीक्षा आवश्यक करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

१९३० चा मुंबई २५.

प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याची सुधारणा.

१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. **७.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ४९ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम ४९-१क समाविष्ट करणे.

"**४९-१ क .** राज्यशासन, विहित करण्यात येतील अशा योग्य त्या अटी व शर्तीवर, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उप संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा योग्य अधिकाऱ्याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करील .". महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षकाची नेमणूक.

## निवेदन.

१३ व्या वित्त आयोगाने करारनिविष्ट केलेल्या सुधारणा, ज्यात इतर अनेक गोष्टींबरोबर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्याचे लेखापरीक्षण संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांच्यामार्फत करण्याच्या तरतुदीचा अंतर्भाव आहे यांची पूर्तता केल्याशिवाय राज्यास सर्वसाधारण कार्यात्मक अनुदान प्राप्त होणार नाही अशी १३ व्या वित्त आयोगाने शिफारस केली आहे.

२. उक्त शिफारशीचे अनुपालन करण्याच्या हेतूने महानगरपालिकांचे लेखापरीक्षण संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा यांचेमार्फत करण्याबाबत तसेच महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा मधील योग्य अधिका-याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक पदावर प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती करण्याची तरतूद करण्यासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते. अशा लेखापरीक्षेचा अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याबाबतची तरतूद हई मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मध्ये करणे आवश्यक आहे, असे देखील दिसून आले आहे.

३. राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही, आणि उक्त प्रयोजनांसाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा मुंबई ३ ), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९ ) आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २ ) यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राचे राज्यपाल यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ९ मार्च २०११.

**के. शंकरनारायणन्,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनुकुमार श्रीवास्तव,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ४५ (२)] शनिवार, मार्च १२, २०११/फाल्गुन २१, शके १९३२ [ पृष्ठ १, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक १८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

---

## शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण क्रमांक १३, भाग चार, दिनांक १० मार्च २०११, पृष्ठ क्रमांक १ ते ४ वर प्रकाशित करण्यात आलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २०११ (सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९) मध्ये,—

(१) पृष्ठ २ वर, ओळ क्रमांक २२ मध्ये, " पाहोचणार " **या ऐवजी** " पोहोचणार " **असे वाचावे ;**

(२) पृष्ठ ३ वर, ओळ क्रमांक १४ मध्ये, " पाहोचणार " **या ऐवजी** " पोहोचणार " **असे वाचावे ;**

(३) पृष्ठ ४ वर, ओळ क्रमांक १२ मध्ये, " हई " **या ऐवजी** " ही " **असे वाचावे.**



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ५९(५)] गुरुवार, मार्च १०, २०११/फाल्गुन १९, शके १९३२ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १४.००

असाधारण क्रमांक १३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. IX of 2011), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. IX of 2011), published under the authority of the Governor.]

---

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 10th March 2011.

## MAHARASHTRA ORDINANCE No. IX OF 2011.

*AN ORDINANCE*

*further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act and the City of Nagpur Corporation Act.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate

action further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act,1949 and the City of Nagpur Corporation Act, 1948, for the purposes hereinafter appearing ; Bom. III of 1888. Bom. LIX of 1949. C. P. and Berar II of 1950.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2011.

(*2*) It shall come into force at once.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT

Amendment of section 78A of Bom. III of 1888.

**2.** In section 78A of the Mumbai Municipal Corporation Act (hereinafter, in this Chapter, referred to as "the Municipal Corporation Act), in sub-section (*1*),— Bom. III of 1888.

(*a*) for the words " The Corporation shall from time to time appoint a fit person to be Municipal Chief Auditor", the words "On and from the date of commencement of section 2 of the Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2011, the State Government, by deputing a suitable officer, not below the rank of the Joint Director from the Maharashtra Finance and Accounts Service shall appoint to be the Municipal Chief Auditor, on terms and conditions as may be prescribed" shall be substituted ; Mah. Ord. IX of 2011.

(*b*) the following proviso shall be added, namely :—

"Provided that, nothing in this section shall affect the appointment and terms and conditions of service of the Municipal Chief Auditor holding office as such on the date of commencement of section 2 of the Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2011.". Mah. Ord. IX of 2011.

**3.** After section 137A of the Mumbai Corporation Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 137B in Bom. III of 1888.

"**137B.** The State Government shall cause the annual accounts of the Corporation, including the accounts of the Brihan Mumbai Electric Supply Undertaking, to be audited by the Director, Local Fund Accounts Audit. On receipt of the report from Director, Local Fund Accounts Audit of such audit, the State Government shall forward it to the Commissioner. The Commissioner shall cause, report of such audit to be laid before the General Body of the Corporation within three months from the date of its receipt. The Commissioner shall, thereafter, take further necessary action on the report as per the provisions of the Maharashtra Local Fund Audit Act.". Power of State Government to require audit by Director, Local Fund Audit. Bom. XXV of 1930.

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE BOMBAY PROVINCIAL MUNCIPAL CORPORATION ACT, 1949

Bom. LIX of 1949. **4.** In section 45 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (hereinafter, in this Chapter, referred to as " the Provincial Corporations Act"), in sub-section *(1)*, the words " Municipal Chief Auditor " shall be deleted. Amendment of section 45 of Bom. LIX of 1949.

**5.** After section 45 of the Provincial Municipal Corporations Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 45A in Bom. LIX of 1949.

"**45A.** On and from the date of commencement of section 5 of the Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2011, the State Government, by deputing a suitable officer, not below the rank of the Deputy Director from the Maharashtra Finance and Accounts Service shall appoint, on such terms and conditions as may be prescribed, a fit person to be the Municipal Chief Auditor: Appointment of Municipal Chief Auditor. Mah. Ord. IX of 2011.

Provided that, nothing in this section shall affect the appointment and terms and conditions of service of the Municipal Chief Auditor holding office as such on the date of commencement of section 5 of the Maharashtra Municipal Corporations (Amendment) Ordinance, 2011.". Mah. Ord. IX of 2011.

**6.** After section 107 of the Provincial Corporations Act, the following section shall be inserted, namely :— Insertion of section 107A in Bom. LIX of 1949.

Power of State Government to require audit by Director, Local Fund Audit.

"**107A.** The State Government shall cause the annual accounts of the Corporation, including the accounts of the Transport Undertaking (if any), to be audited by the Director, Local Fund Accounts Audit. On receipt of the report from Director, Local Fund Accounts Audit of such audit, the State Government shall forward it to the Commissioner. The Commissioner shall cause, report be laid before the General Body of the Corporation within three months from its receipt. The Commissioner shall, thereafter, take further necessary action on the report as per the provisions of the Maharashtra Local Fund Audit Act.". Bom. XXV of 1930.

## CHAPTER IV

### AMENDMENTS TO THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948

Insertion of section 49-1A in C. P. and Berar II of 1950.

**7.** After section 49 of the City of Nagpur Corporation Act, 1948, the following section shall be inserted, namely :— C.P. and Berar II of 1950.

Appointment of Municipal Chief Auditor.

"**49-1A.** The State Government, by deputing an officer not below the rank of the Deputy Director from the Maharashtra Finance and Accounts Service shall appoint a suitable person to be Municipal Chief Auditor on terms and conditions as may be prescribed.".

STATEMENT

The 13th Central Finance Commission has recommended that, only after compliance with the reforms stipulated by the 13th Finance Commission, which *inter alia* consist of provision regarding audit of accounts of the Urban Local Bodies, through the Director, Local Fund Accounts Audit, the State Government will be eligible to get its share of the performance grant.

2. With a view to complying with the said recommendation, the Government of Maharashtra considers it expedient to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 and the City of Nagpur Corporation Act, 1948 by providing for audit of accounts of the Municipal Corporations by the Director, Local Fund Accounts Audit; and appointment of Municipal Chief Auditor by deputation of a suitable officer from the Maharashtra Finance and Accounts Service. A provision regarding laying of the report of such audit done by the Director Local Fund Chief Accounts Audit, before the General Body of the Corporation is also found to be necessary in the Mumbai Municipal Corporation Act and the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949.

3. As both Houses of the State Legislature are not in Session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Mumbai Municipal Corporation Act (Bom. III of 1888), the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949) and the City of Nagpur Corporation Act, 1948 (C.P. and Berar II of 1950), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 9th March 2011.

K. SANKARANARAYANAN,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANU KUMAR SHRIVASTAV,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No.MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ६१] शनिवार, मार्च १२, २०११/फाल्गुन २१, शके १९३२ [ पृष्ठ १, किंमत : रुपये १४.००

## असाधारण क्रमांक १७

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

---

### *ERRATA*

In the English Translation of the Maharashtra cunicipal Corporations (Amendment) Ordinance, 2011 (Mah. Ord. IX of 2011) published in the *Maharashtra Government Gazette*, Extraordinary No. 13, Part VIII, dated the 10th March 2011, at pages 1-5,—

(a) on page 1,—

(i) in line no. 16, *for* " Corporations Act ", *read* " Corporations Act, 1949 " ;

(ii) in line no. 17, *for* " Corporation Act ", *read* " Corporation Act, 1948 " ;

(b) on page 2,—

(i) in line no. 15, *for* " Municipal Corporation ", *read* " Mumbai Corporation " ;

(ii) in line no. 23, *for* " on terms ", *read* " on such terms " ;

(c) on page 4,—

(i) in line no. 6, *for* " report be ", *read* " report to be " ;

(ii) in line no. 19, *for* " on terms ", *read* " on such terms " ;

(d) on page 5, in line no. 16, *for* " Fund Chief Accounts ", *read* " Fund Accounts ".



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.